गोपनिय/तातडीचे

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

जा.क्र. जिविशा/श्रीरामनवमी/वाहतूक अधिसूचना/1975/2023 नांदेड दि. 28.03.2023

दूरध्वनी क्रमांक :- 02462 / 234658, फॅक्स क्रमांक 02462 / 235103

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 36 अन्वये अधिसूचना.**

**अधिसूचना /-**

नांदेड शहरात दिनांक 30.03.2023 रोजी श्रीरामनवमी उत्सव अनुषंगाने मोठया प्रमाणात मिरवणूका काढण्यात येणार आहेत. त्याकरीता सदर कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखणेकामी **मी श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, नांदेड** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 36 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **दिनांक 30.03.2023 रोजी 08.00 वा. पासून ते 24.00 वा. पर्यंत** वरील कलमान्वये खालीलप्रमाणे वाहतूकीच्या नियमनासंबंधाने अधिसूचना काढत आहे.

दिनांक 30.03.2023 रोजी श्री रामनवमी अनुषंगाने शहरातील मुख्य रस्त्याने शोभायात्रा मिरवणूक निघणार असून मुख्य रस्त्यावर मिरवणूकीच्या व वाहनांच्या वाहतूक व्यवस्थेत एक दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात खालील पर्यायी मार्गावरील वाहतूकीस वळण देऊन बदल करण्यात येत आहे.

## वाहतुकी करीता बंद असलेले मार्ग

1. जुना मोंढा, देना बँक, महाविर चौक, तरोडेकर मार्केट, वजिराबाद चौक, कलामंदिर, शिवाजीनगर ते आय.टी.आय. चौक, श्रीनगर, वर्कशॉप कॉर्नरपर्यंत जाणे-येणेसाठी पूर्णपणे बंद राहील.
2. वर्कशॉप टि पॉईट, श्रीनगर ते आय.टी.आय. शिवाजीनगर, कलामंदीर, वजिराबाद चौककडे येणारा रस्ता पूर्णपणे रस्ता बंद राहील.
3. अण्णा भाऊ साठे चौक, हिंगोली गेट, यात्री निवास ,चिखलवाडी कार्नर ते महावीर चौकाकडे येणारा रस्ता वाहतुकीसाठी पुर्ण बंद राहील.
4. यात्री निवास, जुना मोंढा, बर्की चौक (एकमार्गी रस्ता असल्याने ये-जा करण्यासाठी) पुर्णपणे बंद राहील.
5. सिडको , हडको तसेच लातुर फाटा भागातुन नांदेड शहराकडे नावघाट पुलावरुन ईतवारा भागात व नवीन पुलावरुन जुना मोंढा भागात येणारी वाहतुक पुर्ण पणे बंद राहील.

## वाहतुकी करीता पर्यायी मार्ग

1. वजीराबाद चौकाकडुन, श्रीनगर वर्कशॉपकडे जाणारी वाहतुक तिरंगा चौक, पोलीस मुख्यालय मार्ग खडकपुरा लालवाडी अंडर ब्रिज, शिवाजीनगर, पिवळी गिरणी, गणेशनगर वाय पॉईन्टकडे वाहतुकीस जाण्या-येण्यासाठी चालु राहील.
2. राज कॉर्नर ते जुना मोंढा मार्गावरील वाहतूक राज कॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर, आनंदनगर, नाईक चौक, महाराणा प्रताप चौक, बाफना कविता हॉटेल यामार्गाचा वाहतुकीसाठी चालु राहील.